● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३६ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

yuva.aadarsh@gmail.com
RNI: MAHMAR/2019/78282

# युवा आदर्श

https://www.facebook.com/yuvaaadarshnews/
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो. ८३९००९८८८६
सोमवार, दि २६ ऑगस्ट २०२४
https://yuvaadarsh.com

## थोडक्यात...

### बारा जागा आणि मंत्रीपदाची आरपीआयची मागणी

**पुणे -** महायुतीमध्ये आमच्या पक्षावर अन्याय होत आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये आमच्या पक्षाला दोन जागा मिळायला हव्या होत्या. त्या मिळाल्या नाहीत. त्यामुळे आमच्या पक्षावर अन्याय होत असल्याची, काणाडोळा केला जात असल्याची कार्यकर्त्यांची भावना आहे. आता विधानसभा निवडणुकीमध्ये आमच्या पक्षाला बारा जागा मिळाल्या पाहिजेत. तसेच सत्ता मिळाल्यावर मंत्रीपद मिळाले पाहिजे, अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली.

### त्यांनी मागासवर्गीय जनतेची मस्करी करु नये - रिजिजू

**नवी दिल्ली-** किरेन रिजिजू यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत राहुल गांधी यांच्या विधानावर प्रतिक्रिया दिली आहे. राहुल गांधी यांना आता मिस इंडिया स्पर्धा, चित्रपट आणि खेळातही आरक्षण हवं आहे. हा केवळ 'बालबुद्धीचा' मुद्दा नसून त्याचा जयजयकार करणारे लोकही तेवढेच जबाबदार आहेत. अशी विधानं मनोरंजनासाठी चांगली आहेत. मात्र, त्यांनी आता देशातील मागासवर्गीय जनतेची मस्करी करू नये, असे ते म्हणाले.

### बदलापूर येथील अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराचा जाहीर निषेध

**जाफराबाद -** येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राजर्षी शाहू सभागृहात बदलापूर येथील अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या विरोधात सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थापक /अध्यक्ष माननीय. दादासाहेब म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली निषेध नोंदविण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख, उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. सुनील मेढे, उपप्राचार्य प्रा. विनोद हिवराळे प्रा. अनिल वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# केंद्राप्रमाणे राज्यातही लागू होणार नविन पेन्शन योजना

## मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

**मुंबई -** केंद्र सरकारने काल मोठा निर्णय घेत सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवीन पेन्शन योजना लागू केली होती. तशाच प्रकारची योजना आता राज्यातील शासकीय कर्चमाऱ्यांनाही लागू करण्यात आली आहे. आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंदर्भातील निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय इतर काही महत्त्वाचे निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले आहेत.

शनिवारी केंद्रातील मोदी सरकारने सरकारी कर्मचाऱ्यासाठी नवीन यूनिफाइड पेन्शन योजना जाहीर केली होती. या योजनेंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या वर्षातील वेतनाच्या किमान ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून दिली जाणार असल्याचे सरकारद्वारे म्हटलं होतं. तसेच जर पेन्शनधारकाचे निधन झाले, तर त्याच्या कुटुंबाला मृत्युवेळी मिळणाऱ्या पेन्शनच्या ६० टक्के रक्कम दिली जाईल, असेही सरकारकडून सांगण्यात आलं होतं. याशिवाय नोकरदाराने १० वर्षांच्या सेवेनंतर नोकरी सोडली, तर त्याला १० हजार रुपये पेन्शन मिळेल, अशी माहितीही केंद्र सरकारकडून देण्यात आली होती.

हीच योजना आता राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांनासुद्धा लागू करण्यात आली आहे. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२४ पासून या योजनेची अंमलबावणी करण्यात येणार आहे. राज्यातील लाखो कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार असल्याचे राज्य सरकारकडून सांगण्यात आलं आहे.

**मंत्रिमंळाच्या बैठकीतील इतर महत्त्वाचे निर्णय**

आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत इतरही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यातील जास्तीत-जास्त शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज देणाचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यासाठी संबंधित योजनांची व्याप्ती वाढवली जाणार आहे. तसेच गटप्रवर्तकांच्या मानधनात ४ हजारांची भरीव वाढ करण्याचा निर्णयसुद्धा राज्य सरकारने घेतला आहे. याशिवाय स्व. पै.खाशाबा जाधव कुस्ती संकुलाच्या कामाला गती देणे, पर्यायी खडकवासला फुरसुंगी बोगदा निर्माण करणे, नार-पार-गिरणा नदी जोड प्रकल्पासाठी ७ हजार १५ कोटी रुपयांची मान्यता, सहकारी साखर कारखान्यांना शासन हमीवरील कर्ज परतफेडीसाठी संपूर्ण संचालक मंडळावर जबाबदारी, ३० ऑगस्टपर्यंत




शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या, ज्येष्ठ नागरिकांसाठी महामंडळ, ठाणे येथील महत्वाकांक्षी क्लस्टर योजनेसाठी महाप्रित ५ हजार कोटी निधी,'बार्टी' च्या ७६३ विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीचा लाभ आणि मुंबई महानगरात रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना झपाट्याने पूर्ण करण्याचा निर्णयसुद्धा आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

# दारूबंदीसाठी हिवराबळीच्या महिला मंडळ थेट ठाण्यात

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथून जवळ असलेले टेंभुर्णी पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येणारे छोटेसे गाव हिवराबली येथील महिला मंडळींनी गावातील सुरू असलेल्या अवैध दारूसाठी थेट ठाणे गाठले व येथील ठाणे प्रमुख श्री सचिन खामगळ यांना याबाबत निवेदन देऊन ही अवैध दारूबंदी बंद करण्याची मागणी केली. त्यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की ही दारूबंदी शाळेच्या परिसरात सुरू असून रात्री उप रात्री हे दारू पिणारे मंडळी धिंगाणा करून आमचे जीवन जगणे कठीण करून टाकत आहे. यामुळे नेहमीचे ताणतणाव आणि किरकिर आमच्या महिला मंडळ मागे लागले आहे.तरी या बाबत कठोर निर्णय घेऊन ही दारू विक्री कायमची बंद करून या महिला मंडळी यांनी एका अर्जा मार्फत ही मागणी केली आहे. या अर्जावर राष्ट्रवादी महिला मंडळाच्या तालुक्याच्या प्रमुख सौ सुरेखाताई लहाने, सुशिलाबाई जाधव, फुलकोरबाई बोर्डे, कमलबाई जाधव, कासाबाई जाधव, शिलाबाई जाधव म्हस्के, द्वारकाबाई वानखेडे मंडाबाई जाधव, आशाबाई म्हस्के, अनु जाधव, सखुबाई, गिरजाबाई बोर्डे, ज्ञानेश्वर जाधव, रमेश जाधव यांची या निवेदनावर सही आहेत.



गावोगावी महिला दारूबंदीच्या साठी पुढाकार घेत असताना, अवैध दारूविक्री होते, संसार उघड्यावर पडू नये म्हणून महिलांनी घेतलेला हा पुढाकार कौतुक कौतुकास्पद असून, गाव गावच्या महिलांनी अवैध दारूविक्री साठी पुढाकार घेतला पाहिजे अशा मागणी आता होत आहे.

## विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधावा - खामगळ

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** आपल्या पाल्याची काळजी घेण्यासाठी त्यांच्याशी सुसंवाद साधावा. जेणेकरून मनातील न्यूनगंड दूर होऊन सुसंवादाने विद्यार्थी संवेदनशील बनेल. जेणेकरून क्राईम घडण्यास मदत मिळणार नाही, असे प्रतिपादन सहायक पोलिस निरीक्षक सचिन खामगळ यांनी केले.

अकोला देव ता. जाफराबाद येथील जाणता राजा छत्रपती शिवाजी महाविद्यालयात विविध विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. पोस्को, चाइल्ड, सायकॉलॉजी, सायबर क्राईम बाबत विद्यार्थी व पालक यांचेत सुसंवाद असण्यासाठी जनजागृती करण्यात आली मानसिकता ओळखून बालकांच्या रक्षणासाठी पोलिस कायम तत्पर आहेत यामुळे विद्यार्थी व पालकांनी समोरच्या व्यक्तीची मानसिकता ओळखण्याची कला अवगत करावी विशेषतः लहान मुलांनी अनोळखी व्यक्तीशी संवाद साधू नाहीत असे आवाहनही त्यांनी केले. अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक भीमराव शामराव म्हस्के, टेंभुर्णी पोलिस स्टेशनचे गजेंद्र भुतेकर, अकोला उपसरपंच रामेश्वर सवडे, रघुनाथ कदम, शिवनारायण कदम, सर्जेराव साबळे, भास्कर सवडे, लक्ष्मण चाटे आदी उपस्थित होते.

## खा. डॉ. कल्याण काळे यांनी केली जखमी कामगारांची आस्थेवाईकपणे विचारपूस



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील अतिरिक्त औद्योगिक वसाहतीतील गज केसरी स्टील कंपनीत झालेला स्फोट हा भयंकर असून यापूर्वीही अशा घटना घडलेल्या आहेत, या घटनेची जिल्हा प्रशासनाने गंभीर दखल घेवून कामगारांचा जीव वाचवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केले आहे. गज केसरी स्टील कंपनीत झालेल्या दुर्घटनेची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, गज केसरी स्टील कंपनीत झालेल्या स्फोटात ३४ कामगार जखमी झाले असून ७ कामगार हे गंभीर

पान ३ वर

# विकासाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना येणाऱ्या निवडणुकीत धडा शिकवा - अर्जुनराव खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील म्हाडा कॉलनी परिसरात शिवसेना शाखेची स्थापना रविवार (दि २५) रोजी शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आली .यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे, शिवसेनेचे महानगरप्रमुख विष्णू भाऊ पाचफुले, उपजिल्हाप्रमुख गणेश दादा सुपारकर ,उपशहर प्रमुख लक्ष्मण आप्पा अवघड, युवा सेना तालुकाप्रमुख राहुल गवारे, माजी नगरसेवक गोपी किसन घोंगडे,राहुल हिवराळे, राऊत मामा ,भारती काका आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना अर्जुनराव खोतकर म्हणाले की, आपण कुठल्याही पदावर नसताना म्हाडा कॉलनी व परिसरातील विकास कामांना प्राधान्य दिले असून जवळपास 0१ कोटी १५ लक्ष रुपयाचा निधी विकास कामासाठी मा. मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या माध्यमातून उपलब्ध करून घेतला आहे .यामध्ये प्रामुख्याने म्हाडा कॉलनीमध्ये जगताप यांच्या घरासमोर सभागृह

पान ३ वर




# कसे सत्य सांगू, की मला माणसाची भीती वाटते रे...

## 'श्रावण हिरवळ... कवितेचा दरवळ... कवि संमेलन रंगले

**जालना । प्रतिनिधी -** अंजनी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष पोलीस उपनिरीक्षक बालाजी किरवले यांच्या मातोश्री स्व. अंजानी किरवले यांच्या २१ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'श्रावण हिरवळ..कवितेचा दरवळ...' हे निमंत्रितांचे कवि संमेलन बहारदार कवितांनी रंगले. एकापेक्षा एक सरस आणि तितक्याच आशयघन कवितांची बरसात झाल्यामुळे रसिक मंत्रमुग्ध झाले.

जालना शहरातील ब्राह्मण सभा भवनात गुरुवार, २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी 'श्रावण हिरवळ..कवितेचा दरवळ...' हे निमंत्रितांचे बहारदार कविसंमेलन पार पडले. या संमेलनाचे उदघाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव न्यायाधीश श्रीमती भालसाकडे वाघ यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस उपनिरीक्षक बालाजी बालाजी किरवले होते. यावेळी ज्येष्ठ विधीतज्ञ ब्रह्मानंद चव्हाण, जीवरेखा नदी समन्वय एम.डी.सरोदे, ओम हॉस्पिटलचे अर्जुन वाहुळे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. या ठिकाणी

पान ३ वर



## कसोटीत पाकिस्तान विरोधात बांग्लादेशचा विजय

पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. या सामन्यात प्रथम फलंदाजीला आलेल्या पाकिस्तान संघाने ६ बाद ४४८ धावांवर डाव घोषित केला. यादरम्यान पाकिस्तानकडून सौद शकीलने १४१ आणि मोहम्मद रिझवानने १७१ धावा केल्या. यानंतर बांगलादेश संघ प्रत्युत्तरात ५६५ धावांवर गारद झाला. यासह बांगलादेशने पहिल्या डावात ११७ धावांची आघाडी घेतली. त्यानंतर त्यांनी पाकिस्तानला १४६ धावांवर गुंडाळले. ज्यामुळे बांगलादेशला केवळ विजयासाठी ३० धावांचे लक्ष्य मिळाले. ज्याचा पाठलाग बांगलादेशने ६.३ षटकात एकही विकेट न गमावता केला.

युवा आदर्श

**जन्माष्टमीला ...**

संभवामि युगे युगे
शब्द तुझा राखला
जन्म घेई अष्टमीला
दिला सार्थ दाखला
कंसाची बंदिशाळा
गळूनि पडे शृंखला
रात्रीच्या गर्भामधून
तीव्र प्रकाश फाकला
नमन करी कान्हाला
काळ सुध्दा वाकला
बदलूनि टाकले युग
असा फासा टाकला
कृष्णभक्ती मख्खनी
भक्त अवघा माखला
युगा युगाने आनंदाने
अमृत मेवा चाखला
असूरी वधाचा डाव
नियतीने या आखला
अवतारी मनुष्य देही
सुखानंद देई सकला
कृष्णभक्ती न करे जो
संधीला उगा मुकला
रममाण जो भावांमधे
काळाला ही जिंकला

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

# संपादकीय

## भारतीय क्रिकेटमधील 'गब्बर'पर्व संपले

भारतीय क्रिकेट संघातील गब्बर अर्थात भारताचा धडाकेबाज सलामीवीर शिखर धवन याने सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. शनिवारी त्याने एक व्हिडिओ पोस्ट करीत आपल्या निवृत्तीची घोषणा केली. त्याच्या निवृत्तीच्या घोषणे बरोबरच भारतीय क्रिकेट मधील 'गब्बर'पर्व संपले असे म्हणावे लागेल कारण जवळपास एक तप त्याने भारतीय क्रिकेटची सेवा केली. २०१० साली आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलेल्या शिखर धवन याने आपला शेवटचा सामना २०२२ साली खेळला. त्याने २०१० साली भारतीय संघात पदार्पण केले असले तरी भारतीय संघात त्यांची जागा सुरक्षित नव्हती कारण त्यावेळी भारतीय संघात सचिन, सेहवाग आणि गंभीर असे दिग्गज सलामीवीर होते त्यामुळेच त्याला संघात स्थिरवण्यास वेळ लागला. सचिन, सेहवाग, गंभीर यांनी क्रिकेटला राम राम केला तेंव्हा त्यांच्या तोडीची सलामीची जोडी भारताला मिळेल का ? असा प्रश्न क्रिकेट वर्तुळातून विचारला जाऊ लागला. मात्र त्याचे उत्तर लवकरच म्हणजे २०१३ साली इंग्लंडमध्ये झालेल्या चॅम्पियन ट्रॉफी मध्ये मिळाले. या चॅम्पियन ट्रॉफी मध्ये रोहित आणि शिखर धवन ही नवी सलामीची जोडी मैदानात उतरली आणि त्यांनी कमाल करीत भारताला ही ट्रॉफी जिंकून दिली. या चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धेत शिखर धवनला मॅन ऑफ द सिरीज हा पुरस्कार मिळाला. पुढे या सलामीच्या जोडीने दशकभर भारताच्या डावाची सुरुवात करून अनेक विक्रम केले. या जोडीने ११७ एकदिवसीय साम न्यात पाच हजारांहून अधिक धावा काढत अठरा वेळा संघाला शतकी सलामी दिली. रोहित - शिखर जोडी क्रिकेट विश्वातील एक यशस्वी जोडी म्हणून ओळखली जाऊ लागली. शिखर धवन हा मर्यादित षटकांच्या सामन्यात यशस्वी ठरला असला तरी कसोटीतही त्याने चांगली कामगिरी केली आहे. कसोटीत त्याला मर्यादित संधी मिळाली असली तरी त्याने त्याचे सोने केले आहे. ३४ कसोटीत त्याने दोन हजारांपेक्षा जास्त धावा काढल्या. पदार्पणाच्या कसोटीतच त्याने ऑस्ट्रेलिया विरुद्ध धडाकेबाज शतकी खेळी केली होती. या सामन्यात त्याने १८७ धावांची खेळी केली होती. ही खेळी त्याने त्याच्या घरच्या मोहाली मैदनावर केली होती. शिखर धवनने १६७ एकदिवसीय सामन्यात त्याने ६७९३ धावा काढताना १७ शतके झळकावली. टी २० त ही त्याने १७५९ धावा काढल्या. सेना ( िशपर ) देशात साऊथ आफ्रिका, इंग्लंड, न्युझीलंड, ऑस्ट्रेलिया या देशात एकदिवसीय प्रकारात शतके झळकावणारा तो एकमेव भारतीय सलामीवीर आहे. शिखर धवनची आयसीसी ट्रॉफी म धील कामगिरी तर वाखाणण्याजोगी आहे. मैदानावर प्रतिस्पर्धी फलंदाजांचा झेल घेतल्यानंतर मांडीवर थाप मारून मिशीला पीळ देत भांगडा करण्याची त्याची आयकॉनिक स्टाईल प्रेक्षकांना खूप भावली. त्याची हीच स्टाईल गब्बर स्टाईल म्हणून क्रिकेट वर्तुळात प्रसिद्ध झाली. आता त्याने क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारल्या नंतर तो प्रशिक्षक किंवा समालोचकाच्या भूमिकेत दिसेल पण धडाकेबाज सलामीवीर ही त्याची ओळख क्रिकेट रसिकांच्या स्मरणात कायम राहील.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## शस्त्र हातात घे द्रौपदी ताई

का तू रडत आहेस,अन कोणाला बोलवत आहेस,
मदतीला कृष्ण नाही इथे,तुला लढायचे आहे,
कलियुगात बहिरे व आंधळे आहेत सारे
तुलाच शस्त्र हातात घेऊन द्रौपदी लढायचे आहे.
शतयुगात देव होते इथे वासनाधारी दुर्योधन आहे
आता रडायचे नाही ,तलवार घेऊन लढायचे आहे,
अत्याचार करणाऱ्याचे हात पाय तोडायचे आहे
तू शिकार होण्याआधी, त्यांची शिकार तूच करायची आहे.
अग तूच द्रौपदी आहेस,तूच दुर्गा ,तूच काली आहे
कलियुगातले महिषासुर तुलाच मरायचे आहे
अग तूच ताराराणी, तूच झाशीची राणी आहेस,
कलियुगातल्या नराधमांना,
द्रौपदीताई तुलाच फासावर त्यांना दयायचे आहे.

**वैभव गोविंद कुलकर्णी, जालना**

# नवकथेचे अध्वर्यू गंगाधर गाडगीळ!

गंगाधर गोपाळ गाडगीळ हे मराठी लेखक, अर्थतज्ज्ञ व साहित्यसमीक्षक होते. मराठी साहित्यात कथा या साहित्यप्रकारातील त्यांच्या योगदानामुळे त्यांना नवकथेचे अध्वर्यू असे संबोधले जाते. त्यांनी नवकथेमध्ये नवनिर्मिती घडवून आणली. कथेचे नवे वळण विकसित करण्याचे श्रेय गंगाधर गाडगीळ यांचेकडे जाते. गाडगीळ आपल्या कथेतून वाचकांसमोर मनोरम चित्र रेखाटतात, एकरूप होतात. संज्ञा प्रवाही लेखन स्वप्नाचा प्रयोग लेखनात केला.

जन्म आणि शिक्षण: गंगाधर गाडगीळ यांचा जन्म दि.२५ ऑगस्ट इ.स.१९२३ रोजी मुंबईत झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गोपाळराव गाडगीळ होते. त्यांचे शालेय शिक्षण गिरगावातील आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत झाले. या शाळेत इ.स.१९३८मध्ये मॅट्रिक झाल्यानंतर इ.स.१९४४मध्ये त्यांनी चर्नीरोड येथील विल्सन महाविद्यालयातून अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व इतिहास या विषयांमधून एमए केले.

जीवन व साहित्यिक कारकीर्द: एमए झाल्यानंतर दोन वर्षांनी गाडगीळ यांनी आपल्या प्राध्यापकीला सुरुवात केली. आरंभीच्या काळात सुरतच्या किकाभाई प्रेमचंद या महाविद्यालयात व नंतर मुंबईतील पोद्दार, सिडनहॅम आणि रुपारेल या महाविद्यालयांत त्यांनी प्राध्यापक म्हणून काम पाहिले. इ.स. १९६४ ते इ.स. १९७१ या काळात ते मुंबईच्या नरसी मोनजी कॉलेज ऑफ कॉमर्स न्ड इकॉनॉमिक्सचे प्राचार्य होते. इ.स. १९७१ ते इ.स. १९७६ या कालावधीत आपटे समूहाचे सल्लागार व त्यानंतर वालचंद उद्योगसमूहात आर्थिक सल्लागार ही पदे त्यांनी सांभाळली. लहानपणापासून गाडगीळांना वाचनाची आवड होती. त्यातूनच पुढे कॉलेजमध्ये असताना त्यांनी आपल्या लेखनाला सुरुवात केली. प्रिया आणि मांजर ही त्यांची पहिली कथा जून इ.स.१९४१मध्ये वाङ्मयशोभा या मासिकात प्रकाशित झाली. पुढे बरीच प्रसिद्धी मिळालेली बाई शाळा सोडून जातात ही त्यांची कथा देखील वाङ्मयशोभा याच मासिकात इ.स.१९४४मध्ये प्रसिद्ध झाली होती. काही कालावधीनंतर मानसचित्रे हा त्यांचा पहिला कथासंग्रह इ.स.१९४६ साली प्रकाशित झाला. यानंतर ठरावीक काळाने त्यांचे लेखन प्रकाशित होत राहिले. विशेषतः कडू आणि गोड- इ.स.१९४८, नव्या वाटा- इ.स.१९५०, भिरभिरे-इ.स.१९५०, संसार- इ.स. १९५१, उध्वस्त विश्व- इ.स.१९५१, कबुतरे- इ.स.१९५२, खरं सांगायचं म्हणजे- इ.स.१९५४, तलावातले चांदणे- इ.स. १९५४, वर्षा-इ.स.१९५६, ओले उन्ह- इ.स. १९५७ हे त्यांचे उल्लेखनीय कथासंग्रह आहेत. वेगळी वाट चोखाळणाऱ्या या कथासंग्रहांमुळेच नवकथेचे अध्वर्यू हे नामाभिधान त्यांना प्राप्त झाले.

भूषवलेली पदे: इ.स.१९५५मध्ये पंढरपूर येथे झालेल्या साहित्य संमेलनात कथाशाखेचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. पुढे इ.स. १९५७ मध्ये रॉकफेलर फाउंडेशनची एक वर्षाची अभ्यासवृत्ती घेऊन ते हार्वर्ड आणि स्टॅनफोर्ड विद्यापीठात गेले. मध्यप्रदेश मधील रायपूर येथे इ.स.१९८१ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. १ ऑक्टोबर इ.स.१९८३ रोजी मुंबईत झालेल्या मराठी विनोद साहित्य संमेलनाचे उद्घाटन गाडगीळांच्या हस्ते झाले होते. मुंबई मराठी साहित्य संघ व मराठी साहित्य महामंडळ या संस्थांचे अध्यक्ष तसेच साहित्य अकादमीच्या कार्यकारी मंडळावर सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. मुंबईतील ग्राहक पंचायतीत सुमारे ३५ वर्षे त्यांचा सक्रिय सहभाग होता. याच ग्राहक पंचायतीचे ते २५ वर्षे अध्यक्ष देखील होते. एका बाजूला उद्योजक संस्थांचे सल्लागार तर दुसऱ्या बाजूला ग्राहक पंचायतीचे कार्यकर्ते या कामांचा त्यांनी उत्तम समन्वय साधलेला होता.

साहित्य: गंगाधर गाडगीळ यांचे प्रकाशित झालेले साहित्य पुढीलप्रमाणे: कथासंग्रह- अमृत, आठवण, उद्ध्वस्त विश्व इ.स.१९५१, ऊन्ह आणि पाऊस, ओले उन्ह इ.स.१९५७, कडू आणि गोड इ.स.१९४८, कबुतरे इ.स.१९५२, काजवा, खरं सांगायचं म्हणजे इ.स.१९५४, खाली उतरलेलं आकाश, गाडगीळांच्या कथा, गुणाकार, जागृत देशाच्या ज्वलंत, नवलकथा, तलावातले चांदणे इ.स.१९५४, नव्या वाटा इ.स.१९५०, पाळणा, बंडू, जगू आणि खतरनाक अब्दुल्ला, भिरभिरे इ.स.१९५०, वर्षा इ.स.१९५६, संसार, इ.स.१९५१, सोनेरी कवडसे, किडलेली माणसे, माणूस, परि आणि कासव, उध्वस्त विश्व, भागलेला चांदोबा, हजबंड्स ण्ड पम्पकिन्स ण्ड अदर स्टोरीज.

कादंबऱ्या- गंधर्वयुग, दुर्दम्य खंड-१: इ.स. १९७० आणि खंड २: इ.स. १९७१, लोकमान्य टिळकांवरील कादंबरी, प्रारंभ- इ.स. २००२, मन्वंतर (न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या जीवनावरील कादंबरी), लिलीचे फूल इ.स.१९५५, सिंहांच्या राज्यात.

प्रवासवर्णने व नाटके- गोपुरांच्या प्रदेशात इ.स.१९५२, चीन एक अपूर्व अनुभव इ.स.१९९३, नायगाराचं नादब्रह्म इ.स.१९९४, रॉकी... अमेरिकेचा हिमालय, साता समुद्रापलीकडे इ.स.१९७९, हिममय अलास्का, आम्ही आपले थोर पुरुष होणार- बालनाट्य, ज्योत्स्ना आणि ज्योती इ.स.१९६४, बंडूकथा आणि फिरक्या इ.स.१९७६, मुले चोर पकडतात- बालनाट्य, रहस्य आणि तरुणी, वेड्यांचा चौकोन इ.स.१९५२.

समीक्षा ग्रंथ- आजकालचे साहित्यिक इ.स.१९८०, प्रा.गंगाधर गाडगीळ यांचे साहित्य, संपादक- प्रल्हाद वडेर, गंगाधर गाडगीळ: व्यक्ती आणि सृष्टी, संपादिका- प्रभा गणोरकर, खडक आणि पाणी इ.स.१९६०, पाण्यावरची अक्षरे इ.स.१९७९, साहित्य चिंतन शोध

साहित्याचे मानदंड इ.स.१९६२, अन्य ललित वाङ्मय- अशा चतुर बायका, अश्रूंचे झाले हिरे (बालसाहित्य), आठवणीच्या गंधरेखा (आत्मकथन), आम्ही आपले ढब्बोपंत, एका मुंगीचे महाभारत (आत्मचरित्र), एकेकीची कथा संपादिका - प्रभा गणोरकर, गरुडाचा उतरला गर्व (बालसाहित्य), जगू आणि खतरनाक अब्दुल्ला, निवडक गंगाधर गाडगीळ संपादिका- सुधा जोशी, निवडक फिरक्या,

पक्याची गँग (बालसाहित्य), पाच नाटिका, बंडू, बंडूचं गुपचुप, बंडू नाटक करतो, बंडू-नानू आणि गुलाबी हत्ती, बंडू बिलंदर ठरतो, बंडू मोकाट सुटतो, बाबांचं कलिंगड आणि मुलीचा स्वेटर, बायको आणि डोंबलं, बुगडी माझी सांडली गं, भरारी (विश्वनाथ नारायण मंडलिक यांचे चरित्र), भोपळा, महाराष्ट्राचे प्रश्न: काही पाखंडी विचार (वैचारिक), माकड झाले राजा (बालसाहित्य), मुंगीचं समाधान होतच नाही (बालसाहित्य), मुंबई आणि मुंबईकर, मुंबईच्या नवलकथा, यक्षकन्या आणि राजपुत्र (बालवाङ्मय), रत्ने (ललित), लंब्याचवड्या गोष्टी, वा रे वा नव्या फिरक्या, विठू कमळीच्या मुठीत, वेगळं जग, सफर बहुरंगी रसिकतेची, सात मजले हास्याचे, साता समुद्रापलीकडे (ललित लेख), स्नेहलता बंडूला अमेरिकेत नेते, हसऱ्या कथा गंगाधर गाडगीळांच्या.

गौरव व पुरस्कार- अध्यक्ष, मराठी साहित्य संमेलन, रायपूर, इ.स.१९८१. इ.स.१९९६चा साहित्य अकादमी पुरस्कार- एका मुंगीचे महाभारत, जनस्थान पुरस्कार, वासंती गंगाधर गाडगीळ विश्वस्त निधीतर्फे मराठी साहित्यात प्रायोगिक व नावीन्यपूर्ण लेखन करणाऱ्या लेखकाला इ.स.१९९४ सालापासून दर तीन वर्षांनी, गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार दिला जातो. सन २०१२ सालचा हा पुरस्कार राजीव नाईक यांना देण्यात आला. अशा या हरहुन्नरी साहित्यिकाचे दि.१५ सप्टेंबर २००८ रोजी देहावसान झाले. पावन जयंतीनिमित्त त्यांना कोटी-कोटी विनम्र अभिवादन !

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# महाराष्ट्र पोलीस; आन, बान, शान अबाधित ठेवणार काय?

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय हे महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य ह्याचा अर्थ महाराष्ट्र पोलीस सज्जनांचे रक्षण करण्यास आणि दुर्जनांवर नियंत्रण ठेवून त्याचा नायनाट करण्यास कटिबद्ध आहेत.खांद्यावर,टोपीवर,दंडावर पोलीस ब्रीदवाक्य अभिमानानाने मिरवणारे त्यातले आता किती जण प्रामाणिकपणे त्याचा मान राखतात.जनतेची सेवा करायला मिळावी व आपल्या हातून देशसेवा घडताना आपल्या हातून अभूतपूर्व कार्य घडावे ह्यासाठी पोलीस दलात प्रवेश मिळावा म्हणून किती अटीतटीच्या दिव्य प्रसंगातून जावे लागते.कठीण परिश्रम,नियम,कायद्याचे ज्ञान,सामाजिक,राजकीय प्रसंग त्यावेळी त्वरित निर्णय घेण्याची क्षमता,चोरांना अद्दल घडवणे,गुन्हेगाराला शासन करणे,अनैतिक गोष्टीला आला घालणे,ह्या सर्व गोष्टी ट्रेनिगच्या काळात शिकवल्या जातात.सर्व नाही तर काही जण जेव्हा ते नोकरीवर रुजू होताच काही महिन्यातच त्यांच्या आमूलाग्र बदल घडून येतो.इच्छा नसताना नोकरी टिकवायची म्हणून ते काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या आदेशाला बळी पडतात.त्यात कातडी बचाव धोरण, राजकीय वरदहस्त असलेल्या गुंडाना पाठीशी घालणे,भ्रष्ट राजकीय नेते,भ्रष्ट पोलीस वरिष्ठ अधिकारी यांच्यापुढे लाचारीसारखे खांदे पाडून झुकून आपल्या वाकलेल्या कण्याचे प्रदर्शन करणे,आपण मोठ्या कष्टाने पोलीस दलात सामील का झालो ह्याचा विसर पडणे,पोटफुटेस्तोवर मलई ओरबाडणाऱ्या ठिकाणी बदलीसाठी व वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत त्याचा हिस्सा देण्यासाठी काही लाखांची बिदागी देणे,सर्व सामान्य नागरिक तक्रार नोंदवायला आल्यानंतर त्याची दखल न घेता त्याला कित्येक तास तिष्ठत ठेवणे,राजकीय व्यक्ती वा गुंडांकडून तोडपाणी करणे,ह्या अश्या अनेक घटनाचे प्रसारमाध्यमातून व प्रत्यक्ष अनुभव आल्यामुळे सामान्य नागरिक शक्यतो त्रास सहन करतो पण पोलीस स्टेशनची पायरी चढत नाही न्याय का देत नाही असे विचारू शकत नाही.पोलीस दमबाजी करत वेगवेगळी हानी पोचवणारी कलमे सांगून घाबरुवून सोडतात. डोक्याला ताप नको म्हणून आपसात मांडवली करायला सांगतात. पुलिस कि ना दोस्ती अच्छी होती है, ना उनकी दुश्मनी अच्छी होती है.उलट पोलिसांनी त्यांची डागाळलेली प्रतिमा पाहता वादा है मेरा आलोचना करनेवालोंसे, उन्हे मेरी तारीफ करने का मौका अवश्य दूंगा असे म्हणून प्रत्यक्षात आणून दाखवले पाहिजे. कारण, जो बेईमान है, ये वर्दी उन्हे मजबूर बनाती है, जो इमानदार है तो वर्दी उन्हे मजबूत बनाती हैव, मुझे अभिमान है इसका कि,मै हू अंग वर्दि का, किस्मत से मिलता है यह खाकी रंग वर्दी का भ्रष्टाचाराच्या अभिलाषेच्या वा दबावाला बळी न पडता काही प्रमाणित पोलीस अधिकरी असेही म्हणत असतील कि, मुश्किलो से कह दो उलझा न करे हमसे, हमे हर हाल मे जीने का हुनर आता है

काही वर्षापूवी वाहतूक पोलीस खात्यात प्रामाणिकपणाने कर्तव्य बजावणाऱ्या सुनील टोके नावाच्या हवालदाराने कोंडीत सापडलेल्या वाहन चालकांकडून पावती न फाडता दिवसाला वर पर्यंत किती पाकिटे पुरवायची ह्याचा टीव्ही चॅनेलवर भांडाफोड केला होता आज तेच सुनील टोकेच काय झालं,कुठे असतात ते सुरक्षित आहेत काय ?ह्याबद्दल काही माहिती आहे काय ? पूर्वी पोलिसांची प्रतिमा म्हणजे संडे हो हॉलिडे, पुलिस कि छुट्टी कभी नाही होती है, रात भर जागती है पुलिस,तब जाकर जनता चैन से सोती है हे किती आश्वासक छान विचार सत्यात उतरत होते.पोलीस मामा,दादा म्हणून आपुलकीचे नाते जुळायचे ते आता सर,साहेब म्हणून दुरावा निर्माण झाल्यासारखा वाटतो त्याला जबाबदार कोण ? जनतेच्या मनात पोलिसांबद्दल राग. अढी आणि भीतीही आहे.महाराष्ट्र पोलिसांवर दगडफेक करण्यात आली हि फार वेदनादायक दुर्दैवी घटना आहे,पूर्वी कधी असे घडले नाही.पुढे कधी घडू नये.पोलिसांबद्दल आदरभाव व विश्वास होता तो आता लोप का पावत चालला आहे ह्याचा विचार करणार काय ?न्यायालये काही प्रसंगी पोलिसांच्या वर्तणुकीवर समज देतात,आसूड ओढतात हि परिस्थिती पोलीस खाते ओढून का घेतात ? गांभीर्याने विचार करणार काय ? न्याय हक्कासाठी जनता जेव्हा रस्त्यावर उतरते तेव्हा पोलीस अधिकारी कधी कधी सामंजस्याने तोडगा काढतात तर कधी कधी त्यांची हाडे मोडेपर्यंत जोर काढून अमानुष मारहाण करतात.गंभीर बाब नसेल तर खटले दाखल न करता समज देऊन सोडून देणे आवश्यक आहे.उगाचच न्यायालयाचे काम वाढवू नये.पोलिसांच्या जाचाला कंटाळून नागरिक गुन्हेगार होणार नाहीत ह्याची दक्षता घेतली पाहिजे.पोलीस खाते वरपासून खालपर्यंत भ्रष्टाचाराने बरबटलेले आहे अशी जी कलुषित प्रतिमा आहे ती स्वच्छ कशी होईल अशी व्यूह रचना करणे गरजेचे.पूर्वी पोलीस खात्याला पगार कमी होते, भ्रष्टाचार कमी प्रमाणात होता असे म्हणतात,आता मनाजोगत्या पेक्षा अधिक पगार मिळतो मग वरकमाईचा अट्टाहास कशासाठी ? परलोकी जाताना कोणी काही बरोबर घेऊन जात नाही ह्याची जाणीव ठेवणे गरजेचे.लोकप्रतिनिधी हे जनतेचे सेवक आहेत तर पोलीस खाते जनतेचे रक्षक असून त्यांनी आपला स्वाभिमान जागृत ठेवून लोकप्रतिनिधींना अवास्तव महत्व देऊ नये त्यांच्यासमोर लाचारासारखे झुकू नये.त्यांच्या आज्ञेचे पालन करण्यापूर्वी सत्याची कास धरावी व निर्णय घ्यावा.जगात दुसऱ्या क्रमांकावर असणारे महाराष्ट्र पोलीस आता आहेत काय ? असेल तर,प्रथम क्रमांकावर येण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत महाराष्ट्र पोलिसांचा डंका देशातच नव्हे तर जगभर वाजला पाहिजे हि प्रत्येक महाराष्ट्रातील जनतेची अपेक्षा असणार यात शंका नाही.मग,काय साहेब मनावर घेणार काय ?

**यशवंत चव्हाण सीबीडी,बेलापूर (नवी मुंबई )**
**मो.नं.९९२०७७६२७७**

# श्रीकृष्ण जन्माष्टमीचे महत्त्व

पूर्णावतार असलेल्या श्रीकृष्णाने श्रावण कृष्ण पक्ष अष्टमीला पृथ्वीतलावर जन्म घेतला. त्याने बालपणापासून आपल्या असाधारण कर्तृत्वाने भक्तांवरील संकटे दूर केली. प्रतिवर्षी भारतामध्ये मंदिरे, धार्मिक संस्था येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. उत्सव साजरा करतांना प्रांता-प्रांतानुसार उत्सव साजरा करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या असतात. उत्सवाच्या निमित्ताने बरेच लोक एकत्र येऊन भक्तीभावाने हा उत्सव साजरा करतात. यावर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमी ६ सप्टेंबर या दिवशी आहे.या लेखात आपण श्रीकृष्ण जन्माष्टमीचे महत्त्व पहाणार आहोत.

महत्त्व - जन्माष्टमीला श्रीकृष्णतत्त्व नेहमीपेक्षा १००० पटीने कार्यरत असते. या तिथीला ' नमो भगवते वासुदेवाय ।' हा नामजप, तसेच श्रीकृष्णाची अन्य उपासना भावपूर्ण केल्याने श्रीकृष्णतत्त्वाचा अधिक लाभ मिळण्यास साहाय्य होते. मासिक पाळी, अशौच आणि स्पर्शास्पर्श यांचा स्त्रियांवर होणारा परिणाम या दिवशी केलेल्या उपवासाने, तसेच ऋषीपंचमीच्या व्रताने न्यून होतो. (पुरुषांवर होणारा परिणाम क्षौरादी प्रायश्चित्त कर्माने आणि वास्तूवर होणारा परिणाम उदकशांतीने न्यून होतो.)

उत्सव साजरा करण्याची पद्धत - या दिवशी दिवसभर उपवास करून रात्री बारा वाजता बाळकृष्णाचा जन्म साजरा करतात.त्यानंतर प्रसाद घेऊन उपवास सोडतात किंवा दुसर्या दिवशी सकाळी दहीकाल्याचा प्रसाद घेऊन उपवास सोडतात.

श्रीकृष्णाच्या पूजनाचा काळ - श्रीकृष्णाच्या जन्माची वेळ रात्री १२ वाजता असते. त्यामुळे त्यापूर्वी पूजनाची सिद्धता करून ठेवावी. रात्री १२ वाजता शक्य असल्यास श्रीकृष्णजन्माचा पाळणा (गीत) लावावा.

श्रीकृष्णाचे पूजन- श्रीकृष्णाची मूर्ती अथवा चित्र यांची पूजा : श्रीकृष्णजन्माचा पाळणा झाल्यानंतर श्रीकृष्णाची मूर्ती अथवा चित्र यांची पूजा करावी.

षोडशोपचार पूजन : ज्यांना श्रीकृष्णाची 'षोडशोपचार पूजा' करणे शक्य आहे, त्यांनी तशी पूजा करावी.

पंचोपचार पूजन : ज्यांना श्रीकृष्णाची 'षोडशोपचार पूजा' करणे शक्य नाही, त्यांनी 'पंचोपचार पूजा' करावी. पूजन करतांना 'सपरिवाराय श्रीकृष्णाय नमः ।' हा नाममंत्र म्हणत एक एक उपचार श्रीकृष्णाला अर्पण करावा. श्रीकृष्णाला दही-पोहे आणि लोणी यांचा नैवेद्य दाखवावा. त्यानंतर श्रीकृष्णाची आरती करावी. (पंचोपचार पूजा : गंध, हळद-कुंकू, पुष्प, धूप, दीप आणि नैवेद्य या क्रमाने पूजा करणे.)

श्रीकृष्णाची पूजा कशी करावी ? : भगवान श्रीकृष्णाच्या पूजेपूर्वी उपासकाने स्वतःला मध्यमेने, म्हणजे मधल्या बोटाने उभे दोन रेषांचे गंध लावावे किंवा भरीव उभे गंध लावावे. श्रीकृष्णाच्या पूजेत त्याच्या प्रतिमेला गंध लावण्यासाठी गोपीचंदन वापरतात. श्रीकृष्णाची पूजा करतांना त्याला करंगळीजवळच्या बोटाने, म्हणजेच अनामिकेने गंध लावावे. श्रीकृष्णाला हळद-कुंकू वहातांना आधी हळद अन् नंतर कुंकू उजव्या हाताचा अंगठा आणि अनामिका यांच्या चिमटीत घेऊन चरणांवर वाहावे. अंगठा आणि अनामिका जोडून तयार होणार्या मुद्रेमुळे पूजकाच्या शरीरातील अनाहतचक्र जागृत होते. त्यामुळे भक्तीभाव निर्माण होण्यास साहाय्य होते.

श्रीकृष्णाला तुळस का वाहतात ? : देवतेची पवित्रके म्हणजे देवतेचे सूक्ष्मातिसूक्ष्म कण. ज्या वस्तूंमध्ये विशिष्ट देवतेची पवित्रके आकर्षित करण्याची क्षमता इतर वस्तूंपेक्षा अधिक असते, अशा वस्तू त्या देवतेला वाहिल्या, तर साहजिकच देवतेच्या मूर्तीत देवतेचे तत्त्व येते आणि त्यामुळे देवतेच्या चैतन्याचा लाभ आपल्याला लवकर होतो. तुळशीमध्ये कृष्णतत्त्व भरपूर प्रमाणात असते. काळी तुळस हे श्रीकृष्णाच्या मारक तत्त्वाचे, तर हिरव्या पानांची तुळस हे श्रीकृष्णाच्या तारक तत्त्वाचे प्रतीक आहे. यासाठीच श्रीकृष्णाला तुळस वाहतात.

श्रीकृष्णाला कोणती फुले वहावीत ? : कृष्णकमळाच्या फुलांमध्ये श्रीकृष्णाची पवित्रके आकर्षित करण्याची क्षमता सर्वांत अधिक असल्याने ही फुले श्रीकृष्णाला वाहावीत. देवतेच्या चरणी फुले विशिष्ट संख्येत अन् विशिष्ट आकारात वाहिल्यास त्या फुलांकडे देवतेचे तत्त्व लवकर आकृष्ट होते. यानुसार श्रीकृष्णाला फुले वहातांना ती तीन किंवा तीनच्या पटीत अन् लंबगोलाकार आकारात वाहावीत. श्रीकृष्णाला अत्तर लावतांना चंदनाचे अत्तर लावावे. श्रीकृष्णाची पूजा करतांना त्याचे तारक तत्त्व जास्त प्रमाणात आकृष्ट करण्याकरता चंदन, केवडा, चंपा, चमेली, जाई, वाळा आणि अंबर यांपैकी कोणत्याही गंधाच्या उदबत्त्या वापराव्यात, तर श्रीकृष्णाचे मारक तत्त्व अधिक प्रमाणात आकृष्ट करण्याकरता हिना अथवा दरबार या गंधाच्या उदबत्त्या वापराव्यात.

श्रीकृष्णाची मानसपूजा - जे काही कारणास्तव श्रीकृष्णाची प्रत्यक्ष पूजा करू शकत नाहीत, त्यांनी श्रीकृष्णाची 'मानसपूजा' करावी. ('मानसपूजा' याचा अर्थ प्रत्यक्ष पूजा करणे शक्य नसल्यास पूजनाचे सर्व उपचार मानसरित्या (मनाने) श्रीकृष्णाला अर्पण करणे.)

पूजनानंतर नामजप करणे - पूजन झाल्यानंतर काही वेळ श्रीकृष्णाचा ' नमो भगवते वासुदेवाय नमः ।' हा नामजप करावा.

'अर्जुनाप्रमाणे निस्सीम भक्ती निर्माण व्हावी', यासाठी श्रीकृष्णाला मनोभावे प्रार्थना करणे - यानंतर श्रीकृष्णाने श्रीमद्भगवद्गीतेमध्ये दिलेल्या 'न मे भक्तः प्रणश्यति ।' म्हणजे 'माझ्या भक्ताचा नाश होत नाही.' या वचनाचे स्मरण करून आपल्यामध्ये 'अर्जुनाप्रमाणे निस्सीम भक्ती निर्माण व्हावी', यासाठी श्रीकृष्णाला मनोभावे प्रार्थना करावी.'

दहीकाला - विविध खाद्यपदार्थ, दही, दूध, लोणी हे सगळे एकत्र कालविणे म्हणजे 'काला' होय. श्रीकृष्णाने व्रजमंडळात गायी चारतांना स्वतःची आणि सवंगड्यांच्या शिदोर्या एकत्र करून खाद्यपदार्थांचा काला केला अन् सर्वांसह ग्रहण केला. या कथेला अनुसरून पुढे गोकुळाष्टमीच्या दुसर्या दिवशी काला करण्याची व दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली. हल्ली दहीकाल्याच्या निमित्ताने वाटमारी, बीभत्स नाच, महिलांची छेडछाड आदी गैरप्रकार सर्रास होतात. या गैरप्रकारांमुळे उत्सवाचे पावित्र्य नष्ट होऊन उत्सवातून देवतेच्या तत्त्वाचा लाभ तर होतच नाही, उलट धर्महानी होते. वरील गैरप्रकार रोखण्यासाठी प्रयत्न केले, तरच उत्सवाचे पावित्र्य टिकून उत्सवाचा खरा लाभ सर्वांना होईल. असे करणे ही समष्टी स्तरावरची भगवान श्रीकृष्णाची उपासनाच आहे.

हिंदूंनो, धर्महानी रोखून धर्मसंस्थापनेच्या कार्यात सहभागी होऊन श्रीकृष्णाची कृपा संपादन करा !

तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः । (हे अर्जुना, ऊठ, लढायला सिद्ध हो !)

श्रीकृष्णाच्या वरील आज्ञेनुसार अर्जुनाने धर्माचे रक्षण केले आणि तो श्रीकृष्णाला प्रिय झाला ! हिंदूंनो, देवतांचे विडंबन, धर्मांतर, लव्ह जिहाद, मंदिरांतील चोर्या, गोहत्या, मूर्तीभंजन या माध्यमांतून धर्मावर होणार्या आघातांविरुद्ध तुम्हीही स्वक्षमतेनुसार वैध मार्गाने लढा द्या !

भगवान श्रीकृष्ण ही धर्मसंस्थापनेची आराध्य देवता आहे. सध्याच्या काळात धर्मसंस्थापनेसाठी कार्य करणे, ही सर्वोत्तम समष्टी साधना आहे. धर्मसंस्थापना म्हणजे समाजव्यवस्था आणि राष्ट्ररचना आदर्श करण्याचा प्रयत्न करणे होय. धर्मनिष्ठ हिंदूंनो, धर्मसंस्थापनेसाठी म्हणजेच धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत व्हा !

**संदर्भ : सनातन संस्थेचा लघुग्रंथ 'श्रीकृष्ण'**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

# शांतिनिकेतन जालना शहराचे वैभव आता नर्सिंग मधूनही गुणवंत विद्यार्थी घडतील - विरोधी पक्षनेते अंबादास दानवे

**जालना । प्रतिनिधी -** मागील अनेक वर्षांपासून मी पाहतो जालना शहरातून समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शांतिनिकेतन विद्यामंदिर ही शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी संस्था म्हणून आज सर्वपरिचित झालेली आहे. संस्थेचे अनेक संचालक उच्चशिक्षित व शिक्षण क्षेत्राशी संबंधित आहेत. त्यामुळे शाळेचा गुणवत्तेचा दर्जाही चांगला असल्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगितले.

जालना शहरातील शांतिनिकेतन नर्सिंग महाविद्यालयाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, माजी आमदार संतोष सांबरे, जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे, उपजिल्हाप्रमुख बाबुराव पवार, शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोटीवाले, वैद्यकीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश राऊत, देवनाथ जाधव, महिला आघाडीच्या गंगुताई वानखेडे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलतांना अंबादास दानवे म्हणाले की, या संस्थेचा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल सातत्याने सर्वाधिक आहे. या संस्थेला आता

नव्यानेच नर्सिंग अभ्यासक्रम सुरू करण्याची नुकतीच परवानगी मिळाली असल्याने आता आगामी काळात या महाविद्यालयातून गुणवंत विद्यार्थी घडतील यात कोणतीही शंका वाटत नाही. संस्थेचे अध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी ज्या-ज्या क्षेत्रात व पदांवर काम केले त्यात त्यांनी स्वतःला झोकून देऊन सर्वोत्तम काम केले आहे. आता त्यांच्या संस्थेने नव्यानेच नर्सिंग अभ्यासक्रमाला सुरुवात केली आहे. सूरू होत असलेला नर्सिंग अभ्यासक्रम म्हणजे काही कमाईची संधी नसून ती एक सेवेची संधी असल्याचे ते म्हणाले.

**सर्वसामान्य महिला व नागरीकांना डोळ्यासमोर ठेवून नर्सिंग महाविद्यालयाची स्थापना -जिल्हाप्रमुख अंबेकर**

यावेळी प्रास्ताविक करतांना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा संस्थेचे अध्यक्ष भास्करराव अंबेकर म्हणाले की, सर्वसामान्य महिला व नागरीकांना डोळ्यासमोर ठेवून या नर्सिंग महाविद्यालयाची स्थापना केली. अनेक पदव्या घेऊनही आज नोकरी मिळताना दिसत नाही. पण आरोग्य क्षेत्रात परिचारिकांची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसते. म्हणून नर्सिंग अभ्यासक्रम सुरू केला आहे. सदरील शिक्षण घेतल्यानंतर



मुली-मुले लवकरच स्वतःच्या पायावर उभे राहू शकतात. आतापर्यंत या अभ्यासक्रमाकडे जास्तीत जास्त ख्रिश्चन भगिनींचाच ओढा होता. पण या अभ्यासक्रमाचे महत्त्व आता सर्वस्तरातील महिलांच्या लक्षात आल्याने या अभ्यासक्रमाकडे येण्याचे प्रमाण वाढले आहे. संस्था याही अभ्यासक्रमाचे शिक्षण अत्यंत दर्जेदार देणार असल्याने सांगुन सर्वांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केले.

यावेळी संदीप झारखंडे, संदीप नाईकवाडे, गंगुताई वानखेडे, पांडुरंग काळे, अनिल अंभोरे, सखावत पठाण, डॉ.राजेश राऊत, एन.डी.कडोस, जीवन खंडागळे, दर्शन चौधरी, गणेश लाहोटी यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी शिक्षक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कर्मचारी बेमुदत संपास रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक परिषदेचा सक्रिय पाठिंबा - जिल्हाध्यक्ष गायकवाड

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** राज्य सरकारी कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य आणि शिक्षक कर्मचारी समन्वय समितीतर्फे १२ ऑगस्ट २०२४ रोजी जुनी पेन्शन योजना लागू करावी आणि इतर मागण्या मान्य करून अंमलबजावणी करावी या करिता दि. २९ ऑगस्ट २०२४ पासून बेमुदत संपाची नोटीस महाराष्ट्र सरकारला देण्यात आली. त्यानुसार २९ ऑगस्ट पासून महाराष्ट्रातील सर्व सरकारी निमसरकारी कर्मचारी व शिक्षक / शिक्षेकेतर कर्मचारी यांनी संपात सहभागी होण्याचे आवाहन मध्यवर्ती संघटना व कर्मचारी समन्वय समितेने केले आहे. सदर बेमुदत संपास रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक परिषदेने आपला सक्रिय पाठिंबा असल्याचे जिल्हा अध्यक्ष श्री. उदय गायकवाड यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

सदर बेमुदत संपास महाराष्ट्र राज्य प्राथ. शिक्षक मध्यवर्ती संघटनेचे राज्यध्यक्ष श्री. केशवराव जाधव आणि सरचिटणीस श्री. राजेशजी सुर्वे यांनी दिनांक २१ / ८ / २०२४ च्या पत्रान्वये मध्यवर्ती शिक्षक संघटनेचा सक्रिय पाठिंबा दर्शविला असल्याने मध्यवर्ती संघटनेचा घटक असलेली महाराष्ट्र राज्य शिक्षक प्राथमिक परिषद यांनी संपूर्ण महाराष्ट्रात बेमुदत संपात सहभागी होण्याचे आवाहन केले होते त्यास अनुसरून रायगड जिल्हा प्राथ. शिक्षक परिषद दिनांक २९ ऑगस्ट पासून होणाऱ्या संपात सहभागी होत आहे. शासन मागील काही वर्षांपासून जुनी पेन्शन सह विविध मागण्या संदर्भात फक्त तोंडी आश्वासन देत आहे प्रत्यक्षात अंमलबजावणी करीत नसल्याने सदर बेमुदत संप करणे कर्मचारी वर्गास आवश्यक झाले आहे असे जिल्हा अध्यक्ष श्री. उदय गायकवाड यांनी सांगितले.

# येता संकट बालकांवरी १०९८ मदत करी

**जालना -** संकटग्रस्त बालकांना तात्काळ मदतीसाठी भारत सरकारच्या महिला व बाल विकास विभाग नवी दिल्ली व महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्यावतीने ० ते १८ वयोगटातील कोणत्याही प्रकारच्या अडचणीत, संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सर्व बालकांसाठी चाईल्ड हेल्प लाईन सेवा १०९८ संपूर्ण महाराष्ट्रात सुरु केली आहे. तरी जागरुक नागरिकांनी १०९८ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून संकटग्रस्त बालकांना मदत मिळवून द्यावी, असे आवाहन महिला व बाल विकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले आहे.

# काँग्रेसच्या बालेकिल्ल्याला सुरूंग

## लोधीमोहल्ल्यातील राजपूत बांधव शिवसेनेत



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील लोधी मोहल्ला विभागात राजपूत समाजाचे प्राबल्य असून हा विभाग काँग्रेसचा बालेकिल्ला आहे म्हणून ओळखला जातो. या काँग्रेस बालेकिल्लाला शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी सुरुंग लावला. त्यांच्या उपस्थितीत अनेक राजपूत युवकांनी व बांधवांनी युवासेना व शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष राव मोहिते,शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले, नगरसेवक माजी नगरसेवक महेश दुसाने ,शहर संघटक दिनेश भैया भगत, अमोल पैलवान धानुरे,माजी नगरसेवक प्रताप भैय्या वर्मा ,मेघराज चौधरी , मनोज धानोरे ,पांडुरंग शिंदे चतरु वर्मा दीपक काटकर,,किशोर शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना खोतकर म्हणाले की राजपूत समाज पूर्वी शिवसेनेच्या सोबत एक निष्ठेने काम. करत होता ,मध्यंतरीच्या काळामध्ये हा समाज शिवसेना पक्षापासून दुरावला गेला होता .आता पुन्हा हा समाज आपल्या माध्यमातून शिवसेना पक्षाशी जोडला जात आहे .याचा आपल्याला अभिमान असून आनंद होत आहे .यामुळे येणाऱ्या निवडणुकीमध्ये हा समाज काँग्रेस पक्षाला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे आपला विजय निश्चित होणार यामध्ये शंका नाही.

यावेळी राजपूत समाजासाठी सामाजिक सभागृह व महाराणा प्रताप नावाने प्रवेशद्वार बांधकाम करावे अशी प्रमुख मागणी समिजाच्या वतीने केली .यासाठी आपण प्रयत्नशील राहून समाजासाठी सुहज्ज सभागृह व महाराणा प्रताप नावाने प्रवेशद्वार मंजूर करण्यासाठी प्रयत्नशील राहुत व मंजुर करून घेण्यात येईल असे सांगितले.

यावेळी राकेश बजरंगसिंग राजपूत मित्रमंडळ व बजरंगसिंग केवलसिंग राजपूत, दिनेशसिंग जुगलसिंग सूर्यवंशी, राजासिंग राधेश्यामसिंग राजपूत, रामसिंग चंदनसिंग राजपूत, विकाससिंग राजपूत ,भोलासिंग राजपूत, सज्जनशिंग राजपूत ,रोहितसिंग राजपूत, आशिषसिंग राजपूत, अभय चौधरी, अर्जुन राजपूत ,राकेश राजपूत, नरेशसिंग राजपूत, तुलजासिंग राजपूत, अर्जुनसिंग राजपूत, अरुणसिंग राजपूत, गणेश भैय्या सूर्यवंशी, रवीसिंग राजपूत, उमेश राजपूत, रूपचंद राजपूत, नरेश राजपूत, मोहन भैय्या चौधरी, भीमाशिंग राजपूत, शंकरसिंग राजपूत, राहुल चौधरी, यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना युवासेनेत जाहीर प्रवेश केला या सर्वांचे शिवसेना उपनेते नेते अर्जुनराव खोतकर व शहप्रमुख विष्णू पाचफुले यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केल्याबद्दल अभिनंदन केले व त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवसेनेचे कमलेश खरे ,माजी नगरसेवक नरेश खुदभय्ये,मनोज देवरे, राम घडे ,बाबा कुरेशी ,शिवसेनेचे अल्पसंख्याक विभाग उपजिल्हाप्रमुख नजीर भाई कुरेशी, किरण शिरसाट, गोविंद सोनवणे ,दत्ता राऊत, पांडुरंग खैरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# टेंभूर्णीसह परिसरात जोरदार पाऊस, विहीरींच्या पाणीपातळीत वाढ

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** टेंभूर्णीसह परिसरातून सगळीकडे चांगला पाऊस होत असून त्यामुळे टेंभूर्णी व परिसरातील विहीरींच्या पाणीपातळीतही वाढ झाली आहे. आतापर्यंत शेतीच्या माला साठी उपयुक्त पाऊस झाला होता मात्र नदी नाले कोरडे, तर विहिरी ही अजून ही कोरड्या होत्या मात्र मागील काही दिवसात चांगला पाऊस झाला असून दिनांक २८ ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजेपासून संध्याकाळ पर्यंत झालेल्या पावसांने छोटे-मोठे ओढे, नाले चांगल्या प्रकारे वाहू लागल्याने बळीराजा सुखावला आहे. विहीरींना चांगल्या प्रकारे पाणी येण्यास सरूवात झाली असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. या पावासाने रब्बी पिकांना मोठा फायदा होणार होणार असल्याचे शेतकरी संतोष शिंदे यांनी सांगितले. हा पाऊस या मोसमातील सगळ्यात चांगला पाऊस झाल्याचे परिसरातील शेतकरी बांधव सांगत आहे.

# जुने बस स्टॅण्ड येथे हॅलोजन लाईट बसवा - शेख युसूफ

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** जाफराबाद तालुक्यातील सर्वात मोठ्या लोकसंख्येच्या आणि मोठ्या वस्तीचे गाव आहे. या गावांमध्ये अनेक मोठे चौक आहे. या गावातील मोठमोठ्या चौकामध्ये मोठे हॅलोजन लाईट लावलेले होते. जुने बस स्टॅन्ड येथे मोठा गोस पाक चौक आहे. तेथे मज्जित सुद्धा आहे. या समोरील गौस पाच चौकातील हॅलोजन लाईट बंद झालेले आहेत. सामाजिक कार्यकर्ते शेख युसूफ यांनी ग्राम विकास अधिकारी व सरपंच यांना निवेदनाद्वारे विनंती केली आहे की हे लाईट चालू करावे. तेथे प्रार्थना स्थळ असल्याने दहा वाजेपर्यंत येथे रहदारी असते. त्यामुळे येथील लाईट



बसवावेत ही विनंती सामाजिक कार्यकर्ते शेख युसूफ बरोबरच अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. त्याचबरोबर त्यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले गावातील मुख्य चौकामध्ये सुद्धा अशाच पद्धतीची लाईट्स आहेत ते सुद्धा चालू करावेत ही विनंती त्यांनी या माध्यमातून केली आहे.

# जाफराबाद शहराची ४९.४३ कोटींची पाणीपुरवठा योजना मंजूर - डॉ सुरेखा लहाने

**जाफराबाद । प्रतिनिधी -** शहराचा पाणी प्रश्न कायम स्वरूपी सोडवण्याचा प्रयत्न यशस्वी. डॉक्टर सुरेखा लहाने, उपाध्यक्ष,व त्यांचे सर्व नगरसेवक सदस्य, यांच्या अथक परिश्रमातून जाफराबाद नगरपंचायत अंतर्गत जाफराबाद शहराचा पाणी प्रश्न कायम स्वरूपी सोडवण्याचा यशस्वी प्रयत्न केला गेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरोत्थान स्वर्णजयंती अभियानाअंतर्गत जाफराबाद शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी ४९.४३ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. नगरपंचायत ला पत्र मिळाले आहे. ही योजना पाणीपुरवठ्याची खडकपूर्णा प्रकल्प तालुका देऊळगाव राजा या प्रकल्पाच्या जलाशयातून पाण्याचा हक्क मागणी२.२५१लं. घ. मी. प्रकल्पीय पाणी वापराच्या तुलनेत १४.४५ % इतकी असून क्षेत्रीय वाटपाच्या मर्यादित १५ टक्के आहे. शहराची २०२४ ची लोकसंख्या (३०६८४) इतकी विचारात घेऊन मंजुरी देण्यात आली आहे असे शासनातर्फे कळविण्यात आले आहे. यासाठी नगरसेवक,उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच सर्व कर्मचारी, यांनी सुद्धा शहराच्या विकासासाठी आणि या पाणीपुरवठ्यासाठी प्रयत्न केलेले आहेत त्या सर्वांचे डॉक्टर सुरेखा लहाने त्यांनी आभार मानले असून विकासाच्या कामामध्ये असे सहकार्य



अपेक्षित असल्याचे त्यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. शहराच्या विकासासाठी अनेक योजना शासनाकडून आणायचे आहेत त्यासाठी सहकार्याची अपेक्षा आहे. जाफराबाद शहराचा सुंदर शहर म्हणून नावलौकिक मिळवण्यासाठी आमचा प्रयत्न असेल. विकासाचा प्रश्न प्रयत्न असेल अशा प्रकारचे निवेदन त्यांनी प्रसिद्ध दिले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमच्यावतीने मनुस्मृतीचे दहन

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष तथा युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव शेषराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली रविवार दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी १ वाजता मनुस्मृतीचे दहन करुन आंदोलन करण्यात आलं.

संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन करून देशातील सर्व जातींच्या महिलांना सन्मानाने जगण्याचा व समानतेचा हक्क मिळवून दिला. परंतु, शिंदे सरकारने मनुष्मृतीचा अभ्यासक्रमात समावेश करण्याचा निर्णय घेतल्याने त्याला विरोध करण्यासाठी मनुस्मृतीचे दहन करुन आंदोलन करण्यात आलं असल्याचं शेषराव जाधव यांनी म्हटलंय. यावेळी कुणाल दादा राऊत मित्रमंडळाचे अध्यक्ष संतोष जाधव, भाऊसाहेब वारे, सुभाष नरोडे, मदन वाघ, किशोर गायकवाड, भालेराव, विकी आठवले, आकाश हिवाळे, विकास कारगे, प्रभु दाभाडे, प्रभु लोखंडे यांची उपस्थीती होती. दरम्यान मनुस्मृतीचे दहन करुन सरकार विरोधात जोरदार घोषणबाजी करण्यात आली. काँग्रेसचे जेष्ठ नेते व राज्याचे माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात मनुस्मृती दहनाचे आंदोलन करण्यात येत असून त्याच प्रकारे जालना येथे देखील आंदोलन करण्यात आलं. असेही शेषराव जाधव यांनी यावेळी सांगितले.

पान १ व ४ वरुन

## विकासाकडे दुर्लक्ष ...

बांधकामासाठी १५ लक्ष रुपये, सतीश किराणा समोर सभागृह बांधकामासाठी १० लाख रुपये, भारती काका यांच्या परिसरातील भूमिगत नाली बांधकामासाठी १५ लक्ष रुपये , कॉलनी मध्ये सिमेंट रस्त्यासाठी ३०. लक्ष रुपये, वडारवाडी येथे सिमेंट लक्षात साठी दहा लाख, रुपये वडारवाडी येथे सभागृह बांधकामासाठी १५ लाख रुपये, सटवाई तांडा येथे सिमेंट रोड बांधकामासाठी १० लाख रुपये, लाडनिवास समोर सभागृह बांधकामासाठी दहा लाख रुपये, आदी विकास कामांचा समावेश आहे. खरे तर जे नगराध्यक्ष व आमदार म्हणून सत्ता भोगतात त्यांनीही जबाबदारी पार पाडायला पाहिजे होती, परंतु त्यांनी माढा कॉलनी व परिसराकडे डोकावून देखील बघितले नाही. त्यांनी या परिसराला विकासापासून दूर ठेवले आहे. आता येणाऱ्या निवडणुकीत तुमच्या विकासाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना धडा शिकवण्याची खरी वेळ आलेली आहे. त्यांनाही आता मतदानापासून दूर ठेवा . आणि मुख्यमंत्री पुन्हा एकनाथराव शिंदे यांना विराजमान करण्यासाठी शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन केले. शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी शिवसेना शाखेची कार्यकारणी जाहीर केली. यामध्ये प्रामुख्याने शिवसेनेचे उपशहर प्रमुख लक्ष्मण आप्पा अवघड ,शाखाप्रमुख म्हणून रतन लाड, उपशाखाप्रमुख, विजय लाड ,शत्रुघ्न धावडे ,सदस्य म्हणून प्रदीप वाघमारे ,धनंजय नरवडे, पवन साबळे, कुलदीप जुनी ,किशोर लांडगे, दत्ता लाड, गणेश खेडेकर आदीचा समावेश आहे. या कार्यक्रमांमध्येही भाजपचे सरचिटणीस प्रकाशराव गोविंदराव मस्के व आरपीआयचे गौतम वाघमारे यांनी देखील शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला त्यांचेही सर्व मान्यवरांनी शिवसेना पक्षात स्वागत स्वागत केले.

यावेळी शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले म्हणाले की शिवसेनेच्या नवीन पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेचे ध्येयधोरणे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी कार्यरत राहावे व आपले नेते मा.अर्जुनरावजी खोतकर यांच्या माध्यमातून आपल्या परिसराचा विकास करून घ्यावा आज शहरांमध्ये दररोज लाखो रुपयांच्या विकास कामाचे भूमिपूजन उद्घाटन , लोकार्पण समारंभ मा. भाऊ यांच्या माध्यमातून होत आहे त्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू घसरलेली आहे. माढा कॉलनी परिसरात शिवसेनेची शाखा केल्यामुळे नवीन पदाधिकाऱ्यांना मी शुभेच्छा देतो व त्यांचे अभिनंदन करतो. यावेळी शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख प्रमुख कालींदाताई ढगे, नगरसेवक राहुल हिवराळे यांनी देखील उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी किशोर नरोडे, मनोज धानोरे, रामधन पवा,र प्रदीप तौर, अंकुश पवार ,संतोष लाड, किशोर विटेकर, सुधाकर धावरे, प्रवीण जगताप युवासेना विभाग प्रमुख , शरद ढाकणे, कांताराव रांजणकर, किरण शिरसाट ,किरण कोकाटे, रवींद्र ढगे ,अर्जुनराव अवघड यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व महिला भगिनी मोठ्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक किरण शिरसाठ व सूत्र संचालन प्रविण जगताप युवासेना विभाग प्रमुख यांनी केले.यावेळी असंख्य महिला भगिनीं उपस्थितीत होत्या त्यांचे भाऊ यांनी रक्षाबंधन ची भेट देऊन स्वागत केले.

## खा. डॉ. कल्याण काळे ...

जखमी झाले आहेत. दुर्घटनाग्रस्त कंपनीला भेट दिल्यानंतर तेथे कामगारांसाठी सुरक्षा असलेले साहित्य, अग्निरोधक वस्त्रे आढळून आलेली नाहीत, भट्टीची नियमितपणे देखभाल व दुरूस्ती न केल्याने भट्टीचा स्फोट झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे. कंपनी व्यवस्थापन व औद्योगिक सुरक्षा विभागाचे याकडे दुर्लक्ष झाल्याने ही दुर्घटना घडली असल्याचे खासदार डॉ. काळे यांनी सांगितले. स्फोट झालेल्या कंपनीची पाहणी केल्यानंतर डॉ. काळे यांनी स्फोटात जखमी झालेल्या कामगारांवर औषधोपचार सुरू असलेल्या एका खासगी रुग्णालयात जावून जखमी कामगारांची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. या जखमी कामगारांवर योग्य ते औषधोपचार करण्याची विनंती संबंधितांना केली. दरम्यान, खासदार डॉ. कल्याण काळे यांनी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य उपसंचालक धीरज खिरडकर, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्याशी संपर्क साधून या स्फोट प्रकरणाकडे गंभीरपणे लक्ष देण्याच्या सूचना केल्याऔद्योगिक वसाहतीतील कामगारांच्या सुरक्षेकडे कंपनी व्यवस्थापन व औद्योगिक सुरक्षा विभागाने जातीने लक्ष देवून कामगारांना अधिकची सुरक्षा कशी उपलब्ध होईल, याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे डॉ. काळे यांनी यावेळी सांगितले.

## कसे सत्य ...

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव भालसाकडे वाघ मॅडम यांनी मनोगत व्यक्त करताना महिलांचे हक्क कायदे व अधिकार या विषयी थोडक्यात माहिती दिली.. यावेळी कवि डॉ. सुहास सदावर्ते यांच्या 'कसे सत्य सांगू, कसे काय भांडू,
की मला माणसाची भीती वाटते रे..' या आणि कवि कैलास भाले यांनी सादर केलेल्या 'पाऊस अवकाळी, विझवतो चूल गळक्या घराला,अफूची भूल...' या लघु कवितांना रसिकांना अंतर्मुख केले. डॉ. दिगंबर दाते यांनी सादर केलेली 'आभाळात गेलेला बाप आणता येत नसतो परत... असताना कुठे कळतो तो, नसताना बसतो झुरत...' या कवितेने रसिकांची दाद मिळविली. तर गझलकार डॉ. राज रणधीर यांच्या लयबद्ध गझलेने मंत्रमुग्ध केले. कवि पत्रकार अच्युत मोरे स्त्रीभ्रूणहत्येवर भाष्य करणारी 'उमलण्या आधीच कळी त्यांनी खुडून टाकली आहे..' ही कविता सादर केली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक बालाजी किरवले यांनी हलाखीच्या परिस्थितीवर मार्मिक भाष्य करणारी 'माझी परिस्थिती होती कमालीची बिकट, कव्हा असायचे तेलमीठ नसायचे तिखट..' ही कविता गायली. कवि पत्रकार विनोद काळे यांनी राजकारणावर टिप्पणी करणारी 'राजकारणाची पातळी' ही कविता सादर केली.

कवयित्री ज्योती आडेकर यांनी 'उठ नारी तू शस्त्र उठा' ही चेतना जागवणारी कविता सादर केली. कवयित्री रेखा गतखणे, छाया जायभाये, वैशाली फोके, अनिता पाठे त्याचबरोबर गझलकार सुनील लोणकर, डॉ. प्रभाकर शेळके, ड अशोक खेडकर, गणेश खरात, कृष्णा कदम, मनिष पाटील, सुहास पोतदार, शिवाजी तेलंग, प्रा. पंढरीनाथ सारके,लक्ष्मीकांत दाभाडकर या कवींच्या बहारदार कवितांना रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. यावेळी उद्घाटक
न्यायाधीश भारसाकडे वाघ यांनी महिलांना कायदेविषयक माहिती देऊन उद्योग क्षेत्रात उत्तुंग भरारी घेणाऱ्या उद्योगिनी महिलांना शुभेच्छा दिल्या. प्रस्ताविक ज्योती आडेकर यांनी केले.
सूत्रसंचालन मनीषा पाटील यांनी केले. विद्या जाधव यांनी आभार मानले.



**जालना जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे यांची परभणी येथे बदली झाल्याने त्यांना पत्रकारांच्यावतीने निरोप देण्यात आला. यावेळी दै. राजुरेश्वरचे संपादक महेश जोशी, दै युवा आदर्शचे संपादक दीपक शेळके, माहिती सहाय्यक एम.ई. विटेकर, मधुकर खांडेभराड यांच्यासह महिला कर्मचारी.**

## मारोतराव देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील खेळाडूंची जिल्हास्तरावर निवड

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** तालुकास्तरीय पावसाळी स्पर्धेमध्ये कै मारोतराव देशमुख विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपली चमकदार कामगिरी दाखवत कॉम या स्पर्धेमध्ये वयोगट १४ वर्षाखालील खो-खो स्पर्धेमध्ये मुलींच्या संघाची सुद्धा जिल्हास्तरावर निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. दिनकरराव देशमुख व तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक समाधान दुनगहू, जेष्ठ शिक्षक बालू धनवई व वाघमोडे, सुभाष जाधव, बालाजी जोशी, पंजाबराव देशमुख यांनी क्रीडा शिक्षक मोहन मुनेमाणिक व गुणवंत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन, हार्दिक अभिनंदन करण्यात आले. याच वयोगटातील शिवप्रसाद सुसलादे, कुश्रुती काठोळे, कु. दुर्गा मुनेमाणिक या विद्यार्थिनींची जिल्हास्तरावर निवड झाली असून तसेच वयोगट १४ वर्षाखालील संतोष कोल्हे, संभाजी एंडोले, विजय काठोळे, एजाज बेग, गणेश आंधळे, विजय मघाडे, संगीता विधाते, माया पोटे, प्रल्हाद खारतुडे, सुधाकर गंगाबिसन उखर्डे बुद्धिबळ मध्ये या विद्यार्थीची निवड झाल्याची माहिती शाळा प्रशासन यांनी दिली. त्यांचे ही या वेळी अभिनंदन करण्यात आले.

# कमलताई जामकर महिला महाविद्यालयात नविन शैक्षणिक धोरणावर मराठी विषयाची कार्यशाळा

**परभणी । प्रतिनिधी -** नविन शैक्षणिक धोरण छएझ २०२० विद्यार्थी केंद्रित शिक्षणाला प्राधान्य देत ,रोजगाराची निर्मिती,मराठी भाषा शिक्षण संधी वआव्हाने या बाबतीत अभ्यासपूर्ण चिंतन उदघाटकीय भाषणात प्रा.डॉ.डी.एन.मोरे यांनी मांडले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय ,परभणी मराठी विभाग आयोजित पदवी प्रथम वर्ष मराठी विषयाच्या नविन अभ्यासक्रम छएझ-२०२० वर आधारीत परभणी हिंगोली जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळा दि.१७/०८/२०२४ रोजी पार पडली. कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी नूतन विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हेमंतराव जामकर यांनी शुभेच्छा दिल्या.तर उदघाटक म्हणून प्रा.डॉ.डी. एन.मोरे ( सदस्य, व्यवस्थापन परिषद स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड ) प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ वसंतराव भोसले,प्रमुख अतिथी तथा मार्गदर्शक प्रा.डॉ.मा.मा.जाधव (अध्यक्ष,मराठी अभ्यास मंडळ स्वा. रा.ती.म.वि. नांदेड,) सत्राध्यक्ष प्रा.डॉ. शत्रुघ्न जाधव ( मराठी विभाग प्रमुख,आदर्श महाविद्यालय, हिंगोली.) साधन व्यक्ती प्रा.डॉ.कमलाकर चव्हाण (सदस्य,मराठी अभ्यास मंडळ स्वा.रा.ती.म.वि.नांदेड.) प्रा.डॉ.माधव जाधव, (सदस्य, मराठी अभ्यास मंडळ स्वा. रा.ती.म.वि.नांदेड.) प्रा.डॉ. संजय बालाघाटे,( सदस्य, मराठी अभ्यास मंडळ स्वा. रा.ती.म.वि.नांदेड ) प्रा.डॉ.

राजाराम झोडगे (मराठी विभाग प्रमुख,नूतन महाविद्यालय,सेलू.) प्रा.डॉ. पंढरीनाथ धोंडगे (ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर.) उपप्राचार्य डॉ संगीता अवचार,प्रा.अरुण पडघन मराठी विभाग प्रमुख,प्रा.डॉ. आशा गीरी आदींची उपस्थिती



होती. कार्यक्रमाचे सुरुवातीला स्वामी रामानंद तीर्थ आणि कै. सौ. कमलताई जामकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांचे हस्ते पूजन करुन दिपप्रज्वलन करण्यात आले. शैक्षणिक धोरणाची यशस्वीता ही शिक्षकाचे अध्यापन कौशल्य आणि विद्यार्थांचे अध्ययन क्षमता यावर अवलंबून असते नविन अभ्यासक्रमावर चर्चा व्हावी या हेतूने आयोजित या कार्यशाळेत प्राचार्य या नात्याने मान्यवरांचे स्वागत करत उपस्थितांना कार्यशाळा यशस्वीते साठी शुभेच्छा प्राचार्य डॉ.वसंतराव भोसले यांनी दिल्या.

वाड्.मय प्रकारांचा अभ्यास कथा व प्रवास वर्णन या विषयावर डॉ.राजाराम झोडगे, आधुनिक मराठी कविता या विषयावर डॉ.संजय बालाघाटे. स्पर्धा परीक्षा आणि मराठी भाषा या विषयावर डॉ पंढरीनाथ धोंडगे, अभ्यास पत्रिकेचे प्रारूप व रचना या विषयावर डॉ. कमलाकर चव्हाण, गद्यपद्य उपयोजित मराठी या विषयावर डॉ.माधव जाधव या साधन व्यक्तींनी आपले अभ्यासपूर्ण चिंतन मांडले.

मराठी भाषा नविन अभ्यासक्रम विद्यार्थी केंद्रित असून विद्यार्थ्यांना व्यक्तीमत्व विकासाला पुरक आणि रोजगाराची संधी देणारा असल्याचे मत डॉ.मा.मा.जाधव यांनी समारोप प्रसंगी व्यक्त केले. समारोप प्रसंगी अध्यक्ष म्हणून ड.किरणराव सुभेदार ( उपाध्यक्ष, नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था ,परभणी ) यांनी शुभेच्छा दिल्या .प्रमुख अतिथी डॉ.मा.मा.जाधव ( अध्यक्ष मराठी अभ्यास मंडळ स्वा.रा.ती.म.विद्यापीठ ,नांदेड ) प्राचार्य डॉ वसंतराव भोसले यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांचे हस्ते ५० सहभागी प्राध्यापकांना प्रमाणपत्र देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.आशा गीरी यांनी केले तर आभार प्रा.अरुण पडघन यांनी व्यक्त केले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.